| वर्ष - 8 । अंक -94 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज TM

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आजचा जांभळा रंग

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 11 ऑक्टोबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## पिंपरी चिंचवड शहरात खळबळ

# पिंपरीत 350 विद्यार्थ्यांना विषबाधा!

### सँडविच-चटणी खाल्ल्यानंतर मुलांना उलट्या; रुग्णालयात उपचार सुरू

। पिंपरी। महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका नामांकित शाळेतील सुमारे तीनशे विद्यार्थ्यांना अल्पोहारातून मुलांना विषबाधा झाल्याची घटना समोर आली आहे. सँडविच-चटणी खाल्ल्यानंतर विद्यार्थ्यांना उलट्या सुरू झाल्या. त्यानंतर हा प्रकार समोर आला. या घटनेमुळे पिंपरी चिंचवड शहरात खळबळ उडाली आहे. याबाबत प्रशासनाने तात्काळ दखल घेत विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.**



#### ब्रेड सँडविच आणि चटणीतून 300 मुलांना विषबाधा झाल्याची शक्यता

याबाबत मिळालेली माहिती अशी की, सकाळच्या सुमारास विद्यार्थ्यांना अल्पोपारामध्ये ब्रेड सँडविच आणि चटणी देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी ब्रेड आणि सँडविच चटणी खाल्ल्यावर त्यांना त्रास होण्यास सुरुवात झाली. काही मुलांना जुलाब आणि उलट्या सुरू झाल्या. शाळा प्रशासनाच्या ही बाब लक्षात आली.

त्यानंतर शाळा प्रशासनाने काही मुलांना घरी पाठवले. तसेच ज्यांची प्रकृती खालावली त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पिंपरी शहरातील शाहूनगर परिसरातील एका शाळेत हा प्रकार घडला आहे.

दरम्यान, आज शाळेतर्फे मुलांना ब्रेड सँडविच देण्यात आलं होतं. त्यातील ब्रेड आणि चटणीतून ही विषबाधा झाली असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत विषबाधेची घटना घडल्याचं मान्य करत, पीडित विद्यार्थ्यांवर शाळेतर्फे सर्व उपचार केले जातील आणि घटनेची चौकशी केली जाणार असल्याचे सांगत पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं अहवान शाळा प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

#### पालकांकडून संताप व्यक्त

अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी शाळा प्रशासनाने विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. मुलांना दिला जाणारा आहार योग्य आहे की नाही हे तपासणे गरजेचे आहे. यासंदर्भात ज्यांना कोणाला कॉन्ट्रॅक्ट दिले आहे, त्याच्यावर याबाबत कारवाई होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना त्रास जर झाला, तर याला कोण जबाबदार राहणार? अशा संतप्त भावना पालकांकडून व्यक्त केल्या जात आहेत. आता अनेक विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे डॉक्टरांकडून सांगण्यात आले आहे.

## रतन टाटांच्या इच्छेनुसार यंत्रांची धडधड अखंड सुरूच राहिली...

### टाटा मोटर्सवर अवंलबून असलेल्या उद्योगांचा पोशिंदा हरपला; कामगार भाऊक

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

‘माझ्या निधनानंतरही काम बंद नाही झाले पाहिजे,’ या रतन टाटा यांच्या इच्छेचा मान राखून पिंपरी-चिंचवडमधील टाटा मोटर्स कंपनी गुरुवारीही सुरू राहिली. सर्व कामगारांनी नेमून दिलेले काम केले. अर्थात, रतन टाटा यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोरकी भावना मात्र ते लपवू शकले नाहीत. अनेक कामगार त्यांच्याबद्दल बोलताना भावुक होत असल्याचे दृश्य कंपनीत होते.




‘मी गेल्यानंतर उद्योग, व्यवसायावर कोणताही परिणाम होता कामा नये,’ अशी रतन टाटा यांची इच्छा होती. त्यानुसार, त्यांनीच घालून दिलेल्या आदर्शानुरूप टाटा मोटर्सचे काम त्यांच्या निधनानंतर गुरुवारीही सुरू राहिले. त्याच वेळी केंद्र सरकारने रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार द्यावा, अशी मागणी कामगारांनी एकमुखाने केली. टाटा मोटर्स युनियनचे अध्यक्ष शिशुपाल तोमर यांनी ही माहिती दिली. ‘रतन टाटा यांनी पिंपरी-चिंचवडमधील टाटा मोटर्स प्रकल्पामध्येच निवृत्ती घोषित केली होती. त्यांनी सर्व कामगारांशी संवाद साधला होता. ते नेहमी कामगार युनियनचा सन्मान राखत होते.

#### पिंपरी-चिंचवडशी अतूट नाते

पिंपरी-चिंचवड शहरात टाटा मोटर्स कंपनी सन १९६८ मध्ये आली. अनेक लहान-मोठे उद्योग या कंपनीवर अंवलबून आहेत. सद्यस्थितीत कंपनीत दहा हजार कायमस्वरूपी, तर ३० हजार कंत्राटी असे ४० हजार कामगार कार्यरत आहेत. टाटा गृहिणी या विभागामार्फत शहरातील अनेक महिलादेखील टाटा उद्योगाशी जोडल्या गेल्या. काही वर्षांपूर्वी शहरातील उद्योग स्थलांतर करू लागले होते. त्या वेळी रतन टाटा यांनी, ‘शहरातील टाटा उद्योग स्थलांतरित होणार नाही,’ अशी ठाम भूमिका घेतली. या भूमिकेमुळे अनेक उद्योगांचे स्थलांतर थांबले आणि शहराला स्थैर्य लाभले. पिंपरी-चिंचवड शहराचे औद्योगिकनगरी हे नाव सार्थ ठरविण्यामध्येही टाटा उद्योग समूहाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. अनेक लघुउद्योग शहरात सुरू होऊन बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध झाला.

# मुख्यमंत्र्यांसह अर्थमंत्र्यांना कायदेशीर नोटीस

## सरकारने रिझर्व्ह बँकेकडून तीन हजार कोटींचे कर्ज घेतले

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुती सरकारने सुरु केलेली 'लाडकी बहीण योजना' कायमस्वरूपी रोजगार मिळवून न देता भिकारी जीवन जगण्याची सवय लावणारी आहे, असा आरोप करणारी कायदेशीर नोटीस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अर्थमंत्री अजित पवार, मुख्य सचिव तसेच महिला व बाल विकास मंत्रालयाला पाठविण्यात आली आहे.**



राजकीय फायद्यासाठी पैसा वाटणे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेत बसत नाही. 'लाडकी बहीण योजना' राजकीय दृष्ट्या प्रेरित असून, केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लागू केली आहे, असे या नोटीसमध्ये नमूद केले आहे. ज्येष्ठ पत्रकार-लेखक आणि राजकीय विश्लेषक विनय हर्डीकर यांनी ॲड. असीम सरोदे यांच्यामार्फत ही नोटीस पाठवली आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही योजना सुरू केल्याने या योजनेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषणामध्ये दीड हजार रुपयांमध्ये कसे सुधारणार? हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी हर्डीकर यांनी नोटीसीच्या माध्यमातून केली आहे. या योजनेसाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार लाडकी बहीण योजनेसाठी महाराष्ट्र सरकारने रिझर्व्ह बँकेकडून तीन हजार कोटींचे कर्ज घेतले हे सत्य सरकार लपवत आहे. ही योजना निवडणूक झाल्यावर लगेचच लागू करून पाच वर्षे त्यातून महिलांना लाभ मिळाला असता तर या योजनेच्या हेतुवर शंका घेतली नसती. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ मते मिळवण्यासाठी ही योजना लागू केली. या योजनेमुळे तिजोरीवर ताण पडला आहे. वित्तीय उत्तरदायित्व आणि अंदाजपत्रक व्यवस्थापन कायद्यानुसार वित्तीय तूट ही तीन टक्के असणे अपेक्षित आहे. मात्र, लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीमुळे वित्तीय तूट ४.६ टक्के वाढली आहे. तसेच या योजनेमुळे रोजगार निर्मिती होणार हा दावा पोकळ आणि निराधार आहे, असा आरोप या नोटीसीमधून करण्यात आला आहे. दरम्यान, शासनाचे आणि महिलांचे संबंध हे बहीण-भावाचे असू शकत नाही. राज्यघटनेनुसार हे संबंध राज्य आणि नागरिक असे अपेक्षित आहे. या योजनेमुळे दैनंदिन वेतनात वाढ होणार आहे. तसेच तृतीयपंथियांबद्दल देखील या योजनेमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा पक्षपाती व असंवेदनशील दृष्टिकोन दिसून येतो. लिंगपरिवर्तन केलेल्या स्त्रियांना 'बहीण' मानत नाही, असे स्पष्ट होते, असा आक्षेप नोटीशीत घेण्यात आला आहे. राज्यकर्ते हे लोकांसाठी काम करणारे विश्वस्त असतात हे तत्व विसरलेले राजकारण वेदनादायक आहे. कायदेशीर नोटीस मिळाल्यापासून पाच दिवसांत सरकारने उत्तर द्यावे असे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

### दरवर्षी 46 हजार कोटी रुपये खर्च

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही योजना सुरू केल्याने या योजनेबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य आणि पोषणामध्ये दीड हजार रुपयांमध्ये कसे सुधारणार? हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी हर्डीकर यांनी नोटीसीच्या माध्यमातून केली आहे.या योजनेसाठी दरवर्षी ४६ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार लाडकी बहीण योजनेसाठी महाराष्ट्र सरकारने रिझर्व्ह बँकेकडून तीन हजार कोटींचे कर्ज घेतले हे सत्य सरकार लपवत आहे. ही योजना निवडणूक झाल्यावर लगेचच लागू करून पाच वर्षे त्यातून महिलांना लाभ मिळाला असता तर या योजनेच्या हेतुवर शंका घेतली नसती.

# कोथरूडच्या लेकींसाठी कन्या पुजन सोहळ्याचे आयोजन

## कार्यक्रमात जास्तीत जास्त मुलींनी सहभागी होण्याचे आवाहन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रत्येक स्त्री हे देवीचे स्वरूप आहे, असे मानून राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सातत्याने मुली आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत आहेत. राज्यात मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले.**



राज्यासह त्यांनी आपल्या कोथरूड मतदारसंघात देखील महिलांच्या बाबतीत विविध उपक्रमांच्या माध्यमातून अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. हेच ऋणानुबंध वेळोवेळी भक्कम होत गेले. याचाच भाग म्हणून कोथरूडच्या या लेकींसाठी चंद्रकांतदादा पाटील यांच्यावतीने कन्या पुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.कोथरूड मतदारसंघातील लेकीबाळींसाठी ११ ऑक्टोंबर २०२४ रोजी कन्या पुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'नारी तु नारायणी' असे म्हणत पुण्यातील शुभारंभ लॉन्स, डी.पी. रोड म्हात्रे पुलाजवळ संध्याकाळी साडेचार वाजता या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले आहे.

यासाठी जास्तीत जास्त लेकीबाळींनी सहभागी व्हावं, असं आवाहन चंद्रकांतदादा पाटील यांनी केले आहे.हे.कोथरूड मतदारसंघातील लेकीबाळींसाठी ११ ऑक्टोंबर २०२४ रोजी कन्या पुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'नारी तु नारायणी' असे म्हणत पुण्यातील शुभारंभ लॉन्स, डी.पी. रोड म्हात्रे पुलाजवळ संध्याकाळी साडेचार वाजता या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले आहे.

### गरजू लेकींसाठी विविध उपक्रम

दरम्यान, चंद्रकांतदादा आमदार झाल्यापासून कोथरूड मतदारसंघात अनेक मोठे निर्णय महिलांच्याबाबतीत घेण्यात आले आहे. यामध्ये कोथरूडच्या मुलींसाठी सुकन्या योजनेचे खाते उघडणे, दर महिन्याला या खात्यात मुलीच्या पालकांनी पैसे भरावे, यासाठी स्वतः काही प्रोत्साहनपर रक्कम भरणे, मुलींना शैक्षणिक फीची मदत, तिला खेळाडू म्हणून लागणारी मदत, तिचे शारीरिक-मानसिक स्वास्थ टिकून रहावे यासाठी 'मानसी' सारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच सध्याच्या परिस्थितीला प्रत्युत्तर म्हणून तिला स्वसंरक्षण प्रशिक्षण, वैद्यकीय मदत, तसेच एखाद्या गरजू लेकीच्या लग्नासाठी लागणारी भांड्यांची (झाल) मदत देणे असे अनेक उपक्रम गेल्या काही वर्षात अविरत चालू आहेत. अजूनही काही उपक्रमांचे भविष्यात प्रयोजन असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

## आमदार आण्णा बनसोडे यांच्या मागणीवर ‘ऑन दी स्पॉट’ फैसला

# माता रमाई स्मारकाच्या उभारणीला चालना!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महापालिका आयुक्तांना सूचना

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या मागे ‘पीएमपीएमएल’च्या जागेत पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटावा असे त्यागमूर्ती माता रमाबाई यांचे स्मारक उभारणीला चालना मिळाली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांना तात्काळ कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले आहे.**



पिंपरी-चिंचवडमधील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळ्यानिमित्त बुधवारी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शहराचा दौरा केला. यावेळी काही विकासकामांचे भूमिपूजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरीतील आमदार आण्णा बनसोडे अजित पवारांसोबत सावलीसारखे दिसत होते.

पिंपरीतील भीमसृष्टी लगतच्या भूखंडावर त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम प्रलंबित आहे. हे काम तातडीने मार्गी लावण्याच्या मागणीसाठी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारक कृती समिती आणि माता रमाई स्मारक समितीसह आंबेडकरी विचारांच्या सर्व घटकांतील कार्यकर्त्यांनी अनेक वर्षांपासून मागणी लावून धरली आहे. मात्र, जागेच्या अडचणीअभावी सदर स्मारकाचे काम रखडले आहे. या स्मारकासाठी ‘पीएमपीएमएल’ची जागा ताब्यात घ्यावी आणि भव्य स्मारक उभारावे, अशी अपेक्षा आहे.

दरम्यान, महानगरपालिकेच्या विविध विकासकामे भूमिपूजन व लोकार्पण कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार व्यासपीठावर बोलत असताना आमदार आण्णा बनसोडे यांनी त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या स्मारकाबाबत टिपणी दिली. त्यावर तात्काळ निर्णय घेत महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी कार्यवाही करावी. पीएमपीएमएलची आवश्यक तेव्हढी जागा ताब्यात घेण्याबाबत प्रस्ताव द्यावा. पीएमपीच्या आयुक्तांना मी संपर्क करतो आणि पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य असे रमाई स्मारक उभा करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्र्यांनी केली. त्यामुळे आंबेडकरी विचारांच्या समाजामध्ये समाधानाचे वातावरण आहे.

> “ त्यागमूर्ती रमाई आंबेडकर यांच्या भव्य स्मारकासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला सूचना केली आहे. पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटावा, असे भव्य स्मारक उभारण्याकामी आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. आता या स्मारकाच्या कामाला चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे.
>
> **–आण्णा बनसोडे,** आमदार, पिंपरी विधानसभा, राष्ट्रवादी.

---

## संघटनात्मक मोर्चेबांधणीमध्ये भोसरीत भाजपा आघाडीवर!

### दिघी, मोशी, चऱ्होली मंडल पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, आगामी निवडणुकीसाठी पक्ष संघटनावर दिला भर

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संघटनात्मक मोर्चेबांधणीमध्ये भोसरी विधानसभा मतदार संघात भाजपा आघाडीवर आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपाने संघटनावर भर दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणजे मंडल पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येत आहेत.**



दिघी-मोशी-चऱ्होली मंडल पदाधिकाऱ्यांना भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरामध्ये शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या पुढाकाराने संघटनात्मक मोर्चेबांधणी करून या संघटनाच्या माध्यमातून निवडणुकांना सामोरे जाण्याचे भाजपाचे धोरण आहे. त्यानुसार बुधवारी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते दिघी-मोशी,-चऱ्होली मंडल पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

दिघी, मोशी, चऱ्होली मंडल अध्यक्षपदी संतोष भाऊसाहेब तापकीर, सरचिटणीसपदी रवींद्र तापकीर, सौरभ हगवणे, प्रमोद पठारे, नामदेव रढे, दीपक घन, शहा मोहम्मद रमजान खादिम, विक्रम पहिले, प्रताप भांबे यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी विकास आहेर, मच्छिंद्र परांडे, संदीप पंडित, मोहन मंडलिक,निरंजन जैन, जनाराम कुमावत, नवनाथ रसाळ, राकेश तापकीर, तसेच चिटणीस पदी विशाल लांजेवार, गणेश देशमुख विनायक प्रभू, नितीन आहेर, मांगीलाल चौधरी, मंगेश तापकीर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

महिला मंडल अध्यक्षपदी गायत्री तळेकर, युवा मंडल अध्यक्षपदी सुशांत पवार, महिला अध्यक्षपदी कल्पना पाटील, योगेश अकोलवार, चऱ्होली प्रभाग अध्यक्षपदी सुनील काटे यांची निवड करण्यात आली आहे. या पद वाटप कार्यक्रमाला विस्तारक दीपक रजपूत, सरचिटणीस संजय मंगोडेकर, अजय पाताडे, शैला मोळक, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, संयोजक विजय फुगे, दिनेश यादव, निखिल बोऱ्हाडे, वंदना आल्हाट, अजित बुर्डे, ज्येष्ठ नेते रामदास काळजे, दत्तात्या तापकीर, संजय गायकवाड, सचिन तापकीर, उदय गायकवाड, डॉ. सुधाकर काळे, मंडल अध्यक्ष संतोष तापकीर आदी उपस्थित होते.

> “ राष्ट्र प्रथम या भावनेतून भाजपा परिवाराचा प्रत्येक कार्यकर्ता काम करीत आहे. संघटनात्मक कार्यशैली हा भाजपाच्या विजयी वाटचालीचा गाभा आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघांमध्ये संघटनात्मक मोर्चे बांधणीवर आम्ही भर दिला असून, विविध क्षेत्रातील व्यक्ती संघटनेचे पदाधिकारी म्हणून पक्षाशी जोडले जात आहेत. “समाजातील शेवटच्या घटकाचा विकास...” या विचाराने आम्ही काम करीत आहोत.
>
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




# हा राजकीय क्षुद्रपणाच

**दिल्ली सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांचे सरकारी निवासस्थानातील सामान बाहेर काढून नवीन वादाला निमंत्रण दिले. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सरकारी निवासस्थान रिकामे केल्यावर दोनच दिवसांपूर्वी नव्या मुख्यमंत्री अतिशी यांनी या बंगल्यात आपले सामान हलवले.**

नायब राज्यपालांच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिशी यांचे सामानसुमान बाहेर काढून या शासकीय निवासस्थानाला सील ठोकले. मुख्यमंत्र्यांचे सामान हलविण्यात येत असल्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. विशेष म्हणजे अतिशी यांचे सामान बाहेर काढले ते सार्वजनिक बांधकाम विभाग हे खाते मुख्यमंत्र्यांकडेच आहे! केजरीवाल यांनी शासकीय निवासस्थान सोडले असले तरी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तशी नोंद केली नाही. या बंगल्याच्या किल्ल्या केजरीवाल यांनी नवीन मुख्यमंत्री अतिशी यांच्याकडे सुपूर्द केल्या. परिणामी, हे शासकीय निवासस्थान कागदोपत्री अजूनही केजरीवाल यांच्या नावेच आहे. त्याच्या किल्ल्या केजरीवाल यांनी आमच्याकडे परत केल्या नसल्याने कागदोपत्री हे निवासस्थान अजून अतिशी यांना वाटप झालेले



नाही, असा युक्तिवाद सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आला. तसेच सिव्हिल लाइन्समधील हे शासकीय निवासस्थान हे मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान नाही, असाही दावा संबंधित प्रशासन आता करते आहे. मुंबईत 'वर्षा' किंवा बंगळूरुमध्ये कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांसाठी 'अनुग्रह' ही केवळ मुख्यमंत्र्यांसाठी राखीव निवासस्थाने आहेत. दिल्ली या केंद्रशासित प्रदेशात मुख्यमंत्र्यांसाठी राखीव निवासस्थानच नाही, असा याचा अर्थ होतो. अरविंद केजरीवाल हे २०१५ पासून या शासकीय निवासस्थानी राहात होते. २०२१ मध्ये या शासकीय निवासस्थानाचे केजरीवाल यांनी नूतनीकरण केले; त्याच्या खर्चावरून भाजपने वाद निर्माण केला. मग सीबीआयने आरोपांची चौकशीही सुरू केली होती. हे निवासस्थान भाजपच्या एका वरिष्ठ नेत्याला द्यायचे असल्यानेच मुख्यमंत्र्यांचे सामान हलविल्याचा आरोप आम आदमी पार्टीने केला आहे.अतिशी यांनी जिथे सामान हलविले ते मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान नाही, हा दावा मान्य केला तरीही कोणाही मुख्यमंत्र्यांना अशा प्रकारे अवमानित करणे कितपत योग्य, हा प्रश्न उरतोच. हा आचरटपणा नायब राज्यपालांच्या आदेशाशिवाय होणार नाही, हेही तेवढेच निश्चित. सध्या बिगर भाजपशासित राज्यांमध्ये लोकनियुक्त सरकार विरुद्ध राज्यपालांमध्ये वाद ही नित्याची बाब झाली आहे. विधानसभेने मंजूर केलेली विधेयके रोखून धरणे, कुलगुरूंच्या नियुक्त्या, सरकारी आदेश अशा विविध मुद्द्यांवर राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री वाद होत असतात. तमिळनाडूच्या राज्यपालांनी तर अभिभाषण वाचण्यास नकार दिला होता. महाराष्ट्रात भगतसिंह कोश्यारी राज्यपालपदी असताना त्यांना न्यायालयाने त्यांना घटनात्मक कर्तव्याची जाणीव करून दिली होती. पण 'काळी टोपी' घालणाऱ्या कोश्यारी यांना कसलेही सोयरसुतक नव्हते. या वादाचा क्षुद्र आविष्कार दिल्लीत दिसला.खासदारांनी पद गेल्यावर एक महिन्यात शासकीय निवासस्थान सोडावे, असा दिल्लीत नियम आहे. जुलै महिन्यात सुमारे २०० माजी खासदारांना निवासस्थाने रिकामी करावीत म्हणून नोटीस बजाविण्यात आली, पण अद्यापही काही माजी खासदार शासकीय निवासस्थानांमध्ये ठाण मांडून आहेत. काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपला अनुकूल भूमिका घेणारे गुलामनबी आझाद हे आता कोणत्याही घटनात्मक पदावर नसूनही केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या कृपेने कॅबिनेट मंत्र्यासाठी राखीव असलेले शासकीय निवासस्थान त्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. अशी आणखीही उदाहरणे आहेत. पण केवळ विरोधी पक्षाच्या मुख्यमंत्री असल्याने अतिशी यांचे सामान त्यांच्या निवासस्थानातून बाहेर काढण्यात आले. सारी प्रक्रिया पूर्ण करून मुख्यमंत्र्यांना निवासस्थानाचे वाटप केले जाईल, अशी सारवासारव आता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे.

## प्रासंगिक »

### जीवन कळले हो...

***रतन टाटा यांचे निधन हे केवळ एका उद्योगपतीचे जाणे नाही. संस्कृतीच्या मूल्यसाखळीतील महत्त्वाचा दुवा त्यांच्या निधनामुळे आपल्यातून नाहीसा झाला आहे...***

रतन टाटा यांचे निधन हे केवळ एका उद्योगपतीचे देहावसान नाही. ते त्यापेक्षा अधिक काय आहे हे समजून घेण्यासाठी रतन टाटा यांनी काय काय केले यापेक्षा मुळात काय केले नाही, याचा विचार करावा लागेल. जगातील पहिल्या पाच-दहा धनाढ्यांत आपले नाव असावे यासाठी रतन टाटा यांनी कधी प्रयत्न केले नाहीत. टाटा समूह केवळ कमाई या मुद्द्यावर जगात वा देशात सर्वात बलाढ्य उद्योगसमूह व्हावा यासाठी त्यांनी कधी प्रयत्न केले नाहीत. अन्य स्पर्धकांच्या तुलनेत आपल्या कारखान्यास, प्रकल्पास अधिकाधिक मंजुऱ्या मिळाव्यात यासाठी रतन टाटा यांनी कधी प्रयत्न केले नाहीत.तेव्हा त्या राजकारण्यांविरोधात पंतप्रधानांकडे तक्रार करण्याचा उद्योग रतन टाटा यांनी केला नाही. त्यांनी प्रकल्प बाजूला ठेवला. मुंबईत स्वत:च्या मालकीचे बहुमजली इमले उभारून आलिशान ऐषारामी जीवन जगावे.

लोकांपुढे भाषण करताना नेते मंडळी ८० टक्के समाजकारण अन् २० टक्के राजकारण असा आदर्श उद्घोष करतात.पण प्रत्यक्षात मात्र हे प्रमाण उलटे असते. म्हणजे ही मंडळी ८०- ९० टक्के राजकारण करतात अन् १५-२० टक्के समाजकारण करतात. एकदा आपण यांना निवडून दिले.

# आजच्या राजकारणात आहे फक्त स्वार्थ

राजकारण सुरू होते. तीही जग येते निवडणुकीच्या तोंडावर! निवडणुका जवळ आल्या की आश्वासनांचा, सवलतींचा पाऊस पडतो. सरकारकडे पैसा, तरतूद असो वा नसो, तिजोरी खाली केली जाते. हे फुकट ते फुकट, हे माफ ते माफ अशी आमिषे दिली जातात. खरे तर तरुण पिढी असो की महिला, कुणालाही फुकटचे काही नको आहे. प्रत्येकाला स्वाभिमानाने जगायचे आहे. कष्ट करायचे आहेत. त्यांना त्यांच्या योग्यतेचे काम हवे आहे. रिकामपण आहे म्हणून ही मंडळी बिथरलेली दिसतात. आपण जे मोर्चे, आंदोलन बघतो हे बेरोजगारीतून आलेले नैराश्य आहे. माणसाच्या हाताला काम असेल, कष्टातून त्याला जीवनाच्या मूलभूत गरजा भागवता येत असतील तर तो फुकटचे काही मागणार नाही. पण नेत्यांना हे नको आहे. त्यांना अस्वस्थ, चळवळ्या समाज हवा आहे. रिकामटेकडा युवा वर्ग हवा आहे. त्यांच्या भोवती गर्दी करायला. मोर्चे काढायला. त्याचा जयजयकार करायला. नारे



द्यायला...आजचे राजकारण हे जाती धर्मात वाटलेले, द्वेशाला खतपाणी देणारे, समाज वर्गात दरी निर्माण करणारे गलिच्छ राजकरण आहे. राज्याच्या, देशाच्या प्रगती विषयी कुणाला फारसे देणेघेणे असलेले दिसत नाही. प्रत्येक नेत्याला आपली खळगी भरायची आहे. आपलेच वारस पुढे आणायचे आहेत. समाजाला लुटून बंगले बांधायचे आहेत. आपल्या सात पिढ्यांची सोय करायची आहे. त्यासाठी त्यांना तेव्हढ्यापुरते तुमचे लांगुलचालन करायचे आहे. कुणी म्हणेल, असे कसे म्हणता? गेल्या ६०-७० वर्षात काहीच विकास झाला नाही का? देश प्रगत झाला नाही का? नवे तंत्रज्ञान, सोयी सुविधा मिळाल्या नाहीत का? तर मिळाल्या, प्रगती झाली. प्रत्येक क्षेत्रात विकास झाला. शाळा, कॉलेजेसची संख्या वाढली. इंजिनियरिंग, मेडिकल, आयआयटी, आयएएम अशा संस्थांची संख्या कितीतरी पटीने वाढली. दळणवळणाची साधने तर अमाप झालीत. पण त्यापेक्षा कितीतरी पटीने लोकसंख्या वाढली हे आपण विसरतो. देशाची जमीन, नैसर्गिक संसाधने, तेव्हढीच. नद्या, समुद्र, जंगले तेव्हढीच. पण भूमिती श्रेणीने वाढलेल्या लोकसंख्येमुळे नैसर्गिक असमतोल वाढला, प्रदूषण वाढले, नैसर्गिक प्रकोप वाढले. गांधीजी म्हणायचे आपल्या गरजेपुरते देवाने भरपूर दिलेय आपल्याला. पण आपल्या लोभी, लालची वृत्ती पोटी मात्र निसर्ग हतबल झालाय. या असंतुलनाला देशापेक्षा स्वार्थाला महत्व देणाऱ्या नेते मंडळींनी आधिकच बिघडवले. सध्याची अवतीभवतीची परिस्थिती पाहिली तर काय चित्र दिसते? न्याय, नीतीचे नाव नाही. कुठलीही निष्ठा नाही. प्रामाणिकपणा नाही. पक्षाचे धोरण हा पोरखेळ झालाय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मदरशांमधील शिक्षकांच्या मानधनात वाढ!

## मुख्यमंत्र्यांची उत्पन्न मर्यादा वाढवण्यासाठी केंद्राकडे विनंती

। बारामती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्याकरता महत्त्वाचे असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत राज्य मंत्रिमंडळात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र शासनाला करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे.शासनाने ओबीसी आरक्षणासाठी वर्गवारी केली आहे.**



ओबीसींमधील सधन व्यक्तींना आरक्षणातून वगळण्यात आले असून आर्थिक दुर्बल नागरिकांसाठी आरक्षणाची तरतूद केली आहे. ओबीसींमधील सधन गटातील नागरिकांना 'क्रिमिलेअर' तर गरीब घटकाला 'नॉन-क्रिमिलेअर' म्हणून संबोधले आहे. या गटातील व्यक्तींना आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी 'नॉन क्रिमिलेअर' प्रमाणपत्राची गरज असते. त्यासाठी केंद्र सरकारने निकष निश्चित केले आहेत. नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून दिले जाते. ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी किंवा महिला आरक्षणासाठी 'नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र' सादर करावे लागते.त्यानुसार, राज्य सरकारने मंत्रिमंडळात घेतलेल्या निर्णयानुसार नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र सरकारला करण्यात येणार आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या नॉन क्रिमिलेअर उत्पन्नाची मर्यादा आठ लाखांवरून पंधरा लाख रुपये इतकी करण्याची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येणार आहे.हरियाणा निवडणुकीच्या महिन्याभर आधी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनीही क्रिमिलेअर वर्गासाठी वार्षिक उत्पन्न ६ लाखावरून ८ लाख केली होती. आता येत्या काही दिवसांत महाराष्ट्रातही निवडणुका लागणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर हा महत्त्वाचा निर्णय मानला जातोय.राज्यातील विविध समाज घटकांसाठी वेगवेगळी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. लाडशाखीय वाणी-वाणी समाजासाठी सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), लोहार समाजासाठी ब्रह्मलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), शिंपी समाजासाठी संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ त्याचप्रमाणे लोहार आणि नाथ पंथीय समाजासाठी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपकंपन्यांसाठी पन्नास कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्यात येईल.मदरशांमधील डी. एड., बी.एड. शिक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेत राज्यातील मदरसांमध्ये पारंपरिक, धार्मिक शिक्षणाबरोबरच गणित, विज्ञान, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दूचे शिक्षण देण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नेमणूक करण्यात येते. सध्या डी. एड. शिक्षकांना सहा हजार रुपये मानधन देण्यात येते, ते १६ हजार रुपये करण्यात येईल. तसेच माध्यमिकचे विषय शिकवणाऱ्या बी.ए. बी.एड., बी.एस्सी-बी.एड. शिक्षकांचे मानधन आठ हजार रुपयांवरून १८ हजार रुपये करण्यात येईल. या गटातील व्यक्तींना आरक्षणाचे फायदे मिळवण्यासाठी 'नॉन क्रिमिलेअर' प्रमाणपत्राची गरज असते. त्यासाठी केंद्र सरकारने निकष निश्चित केले आहेत. नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र तहसील कार्यालयातून दिले जाते. ओबीसी आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी किंवा महिला आरक्षणासाठी 'नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र' सादर करावे लागते.त्यानुसार, राज्य सरकारने मंत्रिमंडळात घेतलेल्या निर्णयानुसार नॉन क्रिमिलेअरची उत्पन्न मर्यादा वाढवण्याची विनंती केंद्र सरकारला करण्यात येणार आहे. उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या नॉन क्रिमिलेअर उत्पन्नाची मर्यादा आठ लाखांवरून पंधरा लाख रुपये इतकी करण्याची शिफारस केंद्र शासनाला करण्यात येणार आहे.हरियाणा निवडणुकीच्या महिन्याभर आधी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनीही क्रिमिलेअर वर्गासाठी वार्षिक उत्पन्न ६ लाखावरून ८ लाख केली होती. आता येत्या काही दिवसांत महाराष्ट्रातही निवडणुका लागणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर हा महत्त्वाचा निर्णय मानला जातोय.राज्यातील विविध समाज घटकांसाठी वेगवेगळी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

### हरियाणाच्या पार्श्वभूमीवर निर्णय?

लाडशाखीय वाणी-वाणी समाजासाठी सोळा कुलस्वामिनी आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), लोहार समाजासाठी ब्रह्मलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), शिंपी समाजासाठी संत नामदेव महाराज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी), गवळी समाजासाठी श्रीकृष्ण आर्थिक विकास महामंडळ त्याचप्रमाणे लोहार आणि नाथ पंथीय समाजासाठी महामंडळे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपकंपन्यांसाठी पन्नास कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्यात येईल

---

# टाटा हयात असतानाच भारतरत्न द्यायला हवा होता

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे राज ठाकरेंचं पंतप्रधान मोदींना पत्र

। बारामती ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचं ९ ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा मुंबईतील ब्रीच कॅन्डी रुग्णालयात निधन झालं. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित झालेल्या रतन टाटा यांना भारतरत्न मिळायला हवा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. राज्य शासनानेही यासंदर्भात पाठपुरावा करू असं आश्वासन दिलं आहे.**




तर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून रतन टाटा यांना भारतरत्न द्या, अशी मागणी केली आहे. "ज्येष्ठ उद्योगपती आणि गेल्या ३ दशकांत भारतीय उद्योगजगताला आकार देणारे रतन टाटा यांचं निधन झालं. रतन टाटांना तुम्ही पण जवळून ओळखायचात आणि त्यातून तुमच्याही लक्षात आलं असेल की, कुठल्याही मानसन्मानाची अपेक्षा न ठेवणारी व्यक्ती होती. पण भारतीय उद्योगजगताला, भारतीय अर्थव्यवस्थेला त्यांनी दिलेलं योगदान आणि त्याहून महत्वाचं माणूस म्हणून जे त्यांचं मोठेपण आहे, ते अफाट होतं. अशा व्यक्तीला खरंतर ते हयात असतानाच 'भारतरत्न'सारख्या सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित करायला हवं होतं. पण आता किमान त्यांना मरणोत्तर भारतरत्न घोषित व्हायला हवी अशी माझी आणि माझ्या पक्षाची इच्छा आणि अपेक्षा आहे, काही वेगळी अपेक्षा असेल असं मला वाटत नाही!"

### भारतरत्न नाही मग अजून काय?

काल रतन टाटांच्या निधनाची बातमी बाहेर आल्यावर अनेक ठिकाणचे कार्यक्रम लोकांनी स्वतःहून थांबवून श्रद्धांजली वाहिली, मुंबईत तर काही ठिकाणी दांडिया देखील अर्ध्यावर थांबवून लोक २ मिनिट स्तब्ध उभे राहिले! आज सकाळपासून सोशल मीडियावर तमाम भारतीय उस्फूर्तपणे श्रद्धांजली वाहत आहेत आणि प्रत्येकाच्या मनातील भाव असा आहे की आपल्या अगदी घरातील कोणीतरी व्यक्ती गेली आहे. अशा व्यक्ती ह्या 'भारतरत्न'च नाहीत तर काय मग अजून? त्यामुळे याबाबतीत तुम्ही संबंधितांना निर्देश देऊन यावर काही निर्णय घ्याल याची मला खात्री आहे.

# राहुल गांधींचा नेत्यांवर संताप!

## » निवडणुकीतील पराभवावरून राहुल गांधींनी तिखट प्रतिक्रिया

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**हरियाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. भाजपाने ९० पैकी ४९ जागा जिंकत बहुमताचा टप्पा पार केला आहे. तर, काँग्रेसला राज्यात मोठा फटका बसला आहे. काँग्रेसने राज्यात ३७ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे पक्षाला पुन्हा एकदा विरोधी बाकावर बसावं लागणार आहे.**

दरम्यान, हरियाणामधील या पराभवानंतर काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेसची चिंतन बैठक बोलावली होती. या बैठकीत राहुल गांधी यांनी स्थानिक नेत्यांवर संताप व्यक्त केला. ते म्हणाले, राज्यातील काही स्थानिक नेत्यांनी त्यांच्या वैयक्तिक हितांना प्राधान्य दिल्यामुळे आपल्याला हा पराभव पाहावा लागला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे वरिष्ठ नेते देखील उपस्थित होते. या बैठकीला राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, हरियाणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष उदय भान, भूपेंद्रसिंह हुड्डा, काँग्रेसचे हरियाणा प्रभारी दीपक बाबरिया, हरियाणा पर्यवेक्षक अशोक गहलोत उपस्थित होते. या बैठकीत बराच वेळ चर्चा झाली, मात्र बैठकीतून काहीच साध्य झालं नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार काँग्रेसने या पराभवानंतर चिंतन समिती गठित केली आहे जी राज्यातील काँग्रेसच्या पराभवाचं विश्लेषण करेल व आगामी निवडणुकांची तयारी करेल.हरियाणा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवावरून राहुल गांधींनी तिखट प्रतिक्रिया दिली. राहुल गांधी म्हणाले,“राज्यातील नेत्यांनी स्वतःच्या गोष्टींना अधिक प्राधान्य दिलं. त्यामुळे पक्ष मागे पडला. या लोकांनी पक्षाच्या हिताला बगल देत वैयक्तिक फायदे मिळवण्याला प्राधान्य दिलं”. या बैठकीत राहुल गांधी यांनी स्थानिक नेते आणि राज्यातील वरिष्ठ नेत्यांवरील नाराजी जाहीर केली.काँग्रेसची ही बैठक फार वेळ चालली नाही. अर्ध्या तासांत ही बैठक पूर्ण झाली. या बैठकीनंतर काँग्रेस नेते अजय माकन म्हणाले, “पराभवाच्या कारणांवर आम्ही चर्चा केली”. माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंह हुड्डा व कुमारी शैलजा यांच्यातील मतभेदांवर प्रतिक्रिया विचारली असता अजय माकन म्हणाले, “पराभवाची वेगवेगळी कारणं आहेत. केवळ निवडणूक आयोगापासून नेत्यांमधील मतभेदांपर्यंत मर्यादित नाहीत. पराभवाच्या वेगवेगळ्या कारणांवर साधकबाधक चर्चा झाली. पुढेही आम्ही ही चर्चा करू”.राज्यातील काही स्थानिक नेत्यांनी त्यांच्या वैयक्तिक हितांना प्राधान्य दिल्यामुळे आपल्याला हा पराभव पाहावा लागला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे वरिष्ठ नेते देखील उपस्थित होते.या बैठकीला राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, हरियाणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष उदय भान, भूपेंद्रसिंह हुड्डा, काँग्रेसचे हरियाणा प्रभारी दीपक बाबरिया, हरियाणा पर्यवेक्षक अशोक गहलोत उपस्थित होते. या बैठकीत बराच वेळ चर्चा झाली, मात्र बैठकीतून काहीच साध्य झालं नाही. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार काँग्रेसने या पराभवानंतर चिंतन समिती गठित केली आहे जी राज्यातील काँग्रेसच्या पराभवाचं विश्लेषण करेल व आगामी निवडणुकांची तयारी करेल.हरियाणा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवावरून राहुल गांधींनी तिखट प्रतिक्रिया दिली. राहुल गांधी म्हणाले,“राज्यातील नेत्यांनी स्वतःच्या गोष्टींना अधिक प्राधान्य दिलं. त्यामुळे पक्ष मागे पडला. या लोकांनी पक्षाच्या हिताला बगल देत वैयक्तिक फायदे मिळवण्याला प्राधान्य दिलं”. या बैठकीत राहुल गांधी यांनी स्थानिक नेते आणि राज्यातील वरिष्ठ नेत्यांवरील नाराजी जाहीर केली.काँग्रेसची ही बैठक फार वेळ चालली नाही. अर्ध्या तासांत ही बैठक पूर्ण झाली. या बैठकीनंतर काँग्रेस नेते अजय माकन म्हणाले., “पराभवाच्या कारणांवर आम्ही चर्चा केली”. माजी मुख्यमंत्री भूपिंदर सिंह हुड्डा व कुमारी शैलजा यांच्यातील मतभेदांवर प्रतिक्रिया विचारली असता अजय माकन म्हणाले, “पराभवाची वेगवेगळी कारणं आहेत.



### काँग्रेसने राज्यात 37 जागा जिंकल्या

केवळ निवडणूक आयोगापासून नेत्यांमधील मतभेदांपर्यंत मर्यादित नाहीत. पराभवाच्या वेगवेगळ्या कारणांवर साधकबाधक चर्चा झाली. पुढेही आम्ही ही चर्चा करू”.हरियाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने सलग तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. भाजपाने ९० पैकी ४९ जागा जिंकत बहुमताचा टप्पा पार केला आहे. तर, काँग्रेसला राज्यात मोठा फटका बसला आहे. काँग्रेसने राज्यात ३७ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे पक्षाला पुन्हा एकदा विरोधी बाकावर बसावं लागणार आहे. दरम्यान, हरियाणामधील या पराभवानंतर काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेसची चिंतन बैठक बोलावली होती. या बैठकीत राहुल गांधी यांनी स्थानिक नेत्यांवर संताप व्यक्त केला.

# “माफ करा, माझा कुत्रा आजारी आहे”

## » रतन टाटांनी प्रिन्स चार्ल्सकडून मिळणारा पुरस्कारही नाकारला

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारतीय उद्योग विश्वाचे अध्वर्यू रतन टाटा यांचं बुधवारी रात्री मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झालं आणि उद्योग विश्वावर शोककळा पसरली. उद्योग क्षेत्रात कमालीच्या स्पर्धात्मक वातावरणात माणुसकी, आपुलकी, जिव्हाळ्याची असंख्य नाती निर्माण करणारा हा अवलिया काळाच्या पडद्याआड गेला.**

उद्योग क्षेत्रातील त्यांच्या अभूतपूर्व यशापेक्षाही त्यांच्यातल्या माणुसकीवर सगळ्यांनी भरभरून प्रेम केलं. पण टाटांचा फक्त माणसांवरच नाही, तर मुक्या प्राण्यावरही प्रचंड जीव होता. याची साक्ष पटवून देणारा एक प्रसंग सहा वर्षांपूर्वी घडला आणि प्रत्यक्ष ब्रिटिश राजघराणंही टाटांच्या या स्वभावामुळे प्रभावित झालं! रतन टाटांचं कुत्र्यांवर प्रचंड प्रेम होतं. आणि त्यांच्या याच प्रेमाचा अनुभव थेट ब्रिटिश राजघराण्यालाही आला. हा प्रसंग सहा वर्षांपूर्वीचा म्हणजेच २०१८ सालातला आहे. रतन टाटा यांनी उद्योगक्षेत्राप्रमाणेच सामाजिक आयुष्यातही परोपकारी व निस्वार्थी भावनेनं प्रचंड मोठं काम केलं. त्यांच्या वेगवेगळ्या कंपन्या व स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून त्यांनी गरीबांना मदत करण्याचे अनेक उपक्रम राबवले. भारतीय समाजात सकारात्मक बदल घडवण्याचं त्यांचं स्वप्न होतं. त्यासाठीच त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धात स्वत:ला झोकून दिलं होतं. आणि त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्याचा सन्मान करण्याचं ब्रिटिश राजघराण्यानं ठरवलं होतं!६ फेब्रुवारी २०१८ रोजी ब्रिटनच्या बकिंगहम पॅलेसमध्ये हा सोहळा ठरला होता.

ब्रिटिश राजघराण्यानं रतन टाटांचा सन्मान करण्यासाठी जंगी सोहळ्याचं आयोजन केलं होतं. प्रत्यक्ष राजघराण्याकडूनच पुरस्कार प्रदान केला जाणार होता, त्यामुळे कार्यक्रमाचं आयोजन, निमंत्रितांची सोय आणि इतर सर्व बाबी तशाच जंगी होत्या. सारंकाही ठरलं होतं. रतन टाटांना थेट प्रिन्स चार्ल्स तृतीय यांच्याहस्ते त्यांच्या समाजकार्यासाठी जीवनगौरव पुरस्कार देण्यात येणार होता. हा पुरस्कार मिळणं हा एक मोठा सन्मान होता.



### पुरस्कारापेक्षाही त्यांचे कुत्रे प्रिय

पण रतन टाटांनी या पुरस्कार सोहळ्याला येण्यास चक्क नकार दिला! उद्योजक सोहेल सेठ हे स्वत: या कार्यक्रमासाठी जाणार होते. त्यामुळे त्यांनी यासंदर्भातला प्रसंग एका इन्स्टा पोस्टमध्ये सांगितला आहे! आधी रतन टाटांनी सोहळ्यासाठी येण्याची तयारी दर्शवली होती. ठरल्यानुसार सगळं नियोजन झालं. त्यानुसार बकिंगहम पॅलेसमध्ये तयारीही सुरू झाली. पण सोहळ्याच्या अगदी दोन ते तीन दिवस आधीच रतन टाटांनी आपण येऊ शकत नसल्याचं कळवलं!



# नवरात्रीचा नववा दिवस सिद्धिदात्रीची देवीचा!

महानवमीच्या दिवशी माँ दुर्गेचे नववे रूप माता सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. नवमी तिथीशी संबंधित खास गोष्टी-

माँ दुर्गाला समर्पित नवरात्रीचा पवित्र सण नवमी तिथीपासून संपेल. नवरात्रीच्या नवमीला माँ दुर्गेचे नववे रूप माँ सिद्धिदात्रीची पूजा केली जाते. असे मानले जाते की माता सिद्धिदात्री भक्तांच्या मनोकामना पूर्ण करते आणि भक्तांना कीर्ती, शक्ती आणि धन देखील प्रदान करते. शास्त्रात सिद्धिदात्री आईला सिद्धी आणि मोक्षाची देवी मानण्यात आली आहे. जर आपण माता सिद्धिदात्रीच्या रूपाबद्दल बोललो तर ती माता राणी महालक्ष्मीच्या कमळावर विराजमान आहे. आईला चार हात आहेत. आईने हातात शंख, गदा, कमळाचे फूल आणि चकती घेतली आहे. माता सिद्धिदात्री हे देखील माता सरस्वतीचे रूप मानले जाते. नवमी तिथीला मुलींची पूजा करण्याचीही परंपरा आहे. असे मानले जाते की नवमीच्या दिवशी कन्येची पूजा केल्याने व्यक्तीला शुभ फल प्राप्त होते.

# इंग्लंडने भारताचा विक्रम मोडला!

## तीन वेळा 800 किंवा त्याहून अधिक धावा करणारा पहिला संघ

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**हॅरी ब्रूकच्या त्रिशतकाच्या बळावर इंग्लंडने पाकिस्तानविरुद्धच्या मुलतान कसोटीच्या चौथ्या दिवशी अनेक विक्रम केले. पाकिस्तान विरुद्धच्या ३ सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी इंग्लंडने आपला पहिला डाव ७ बाद ८२३ धावांवर घोषित केला. यासह इंग्लंड कसोटी क्रिकेटमध्ये तीन वेळा ८०० किंवा त्याहून अधिक धावा करणारा पहिला संघ ठरला आहे.**




पाकिस्तान विरुद्ध इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यातील गोलंदाजांच्या खराब कामिगिरी सर्वत्र टीका होत आहे. मुलतान क्रिकेट स्टेडियमच्या सपाट खेळपट्टीवर पहिल्या दिवसापासून मोठे विक्रम रचले जात आहेत. पाकिस्तानच्या तीन फलंदाजांनी शतके झळकावली आहेत, तर इंग्लंडच्या दोन फलंदाजांनी द्विशतके झळकावली. या सामन्यादरम्यान इंग्लंडने भारताचा २० वर्ष जुना विक्रम मोडीत काढला आहे.सध्या सुरू असलेल्या कसोटी सामन्यापूर्वी पाकिस्तानमध्ये प्रतिस्पर्धी संघाने सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताच्या नावावर होता. याच मैदानावर २००४ मध्ये भारताने पाच विकेट्सवर ६७५ धावांवर डाव घोषित केला होता. हा तोच कसोटी सामना होता ज्यात वीरेंद्र सेहवागने त्रिशतक झळकावले होते आणि सचिन तेंडुलकर १९४ धावांवर नाबाद परतला होता. इंग्लंडने मुलतान कसोटीत पहिला डाव ७ विकेट्सवर ८२३ धावांवर घोषित केला.पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ५५६ धावा केल्या. कर्णधार शान मसूदने सर्वाधिक १५१ धावांचे योगदान दिले, तर आगा सलमानने १०४ धावा केल्या तर अब्दुल्ला शफीकने १०२ धावा केल्या. इंग्लंडची सुरुवात चांगली झाली नाही आणि कर्णधार ऑली पोप खातेही न उघडता बाद झाला, पण यानंतर इंग्लिश फलंदाजांनी पाकिस्तानी गोलंदाजांना आनंद साजरा करण्यासाठी फार कमी संधी दिल्या.जो रूट ३७५ चेंडूत २६२ धावा करून बाद झाला आणि या खेळीत त्याने इंग्लंडसाठी अनेक विक्रम केले. ज्यामध्ये इंग्लंडकडून सर्वाधिक कसोटी धावांचा विक्रमही समाविष्ट आहे. या खेळीत रूटने २० हजार आंतरराष्ट्रीय धावाही पूर्ण केल्या. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने ७८ तर बेन डकेटने ८४ धावा केल्या. हॅरी ब्रूकने त्रिशतक झळकावले आणि ३१७ धावा करून बाद झाला. पाकिस्तानी गोलंदाजांच्या नावावर एक नकोसा विक्रम झाला आहे. या सामन्यात पाकिस्तानकडून ७ खेळाडूंनी गोलंदाजी केली. यापैकी ६ जणांनी १०० किंवा त्याहून अधिक धावा दिल्या. आतापर्यंत, कसोटी क्रिकेटमध्ये असे एकदाच घडले आहे, जेव्हा संघाच्या ६ गोलंदाजांनी १०० किंवा त्याहून अधिक धावा दिल्या आहेत. यापूर्वी असा नकोसा विक्रम झिम्बाब्वेच्या गोलंदाजांच्या नावावर होता, जेव्हा २००४ मध्ये बुलावायो येथे त्यांच्या ६ गोलंदाजांनी १०० किंवा त्याहून अधिक धावा दिल्या होत्या.७ बाद ८२३ धावा ही इंग्लंडची पाकिस्तानविरुद्धची सर्वोच्च धावसंख्या आहे, ज्यांनी १९५८ मध्ये वेस्ट इंडिजने रचलेला ३ बाद ७९० धावांचा विक्रम मागे टाकला. इंग्लंडने त्यांच्या मागील पाकिस्तान दौऱ्यात रावळपिंडी येथे प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलमच्या नेतृत्वाखाली इंग्लंडने केलेल्या ६५७ धावांच्या धावसंख्येला मागे टाकून इंग्लंडने ही सर्वोच्च धावसंख्या नोंदवली आहे. २०२३ च्या ॲशेसमध्ये त्यांनी ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या ५९२ धावसंख्येलाही मागे टाकले आहे. हॅरी ब्रूक फलंदाजीला आला तेव्हा २४९ धावांवर इंग्लंडच्या ३ विकेट पडल्या होत्या. यानंतर ब्रूकने रुटबरोबर चौथ्या विकेटसाठी ४५४ धावांची विक्रमी भागीदारी केली आणि संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. ब्रूकने त्रिशतक झळकावले तर रूटने दणदणीत द्विशतक झळकावले. रुट २६२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. पाकिस्तानच्या तीन फलंदाजांनी शतके झळकवली आहेत, तर इंग्लंडच्या दोन फलंदाजांनी द्विशतके झळकावली. या सामन्यादरम्यान इंग्लंडने भारताचा २० वर्ष जुना विक्रम मोडीत काढला आहे.सध्या सुरू असलेल्या कसोटी सामन्यापूर्वी पाकिस्तानमध्ये प्रतिस्पर्धी संघाने सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम भारताच्या नावावर होता. याच मैदानावर २००४ मध्ये भारताने पाच विकेट्सवर ६७५ धावांवर डाव घोषित केला होता. हा तोच कसोटी सामना होता ज्यात वीरेंद्र सेहवागने त्रिशतक झळकावले होते

### हॅरी ब्रूक-जो रूटची विक्रमी भागीदारी

पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ५५६ धावा केल्या. कर्णधार शान मसूदने सर्वाधिक १५१ धावांचे योगदान दिले, तर आगा सलमानने १०४ धावा केल्या तर अब्दुल्ला शफीकने १०२ धावा केल्या. इंग्लंडची सुरुवात चांगली झाली नाही आणि कर्णधार ऑली पोप खातेही न उघडता बाद झाला, पण यानंतर इंग्लिश फलंदाजांनी पाकिस्तानी गोलंदाजांना आनंद साजरा करण्यासाठी फार कमी संधी दिल्या.ज्यामध्ये इंग्लंडकडून सर्वाधिक कसोटी धावांचा विक्रमही समाविष्ट आहे. या खेळीत रूटने २० हजार आंतरराष्ट्रीय धावाही पूर्ण केल्या.

---

# लाल मातीवरील बादशाहचा टेनिसला अलविदा

## अश्रूभरल्या डोळ्यांनी राफेल नदालने निवृत्तीची केली घोषणा

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टेनिसपटू राफेल नदालने आपल्या करिअरला अखेरचा निरोप दिला आहे. या दिग्गज खेळाडूने गुरुवारी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर करून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली. या व्हीडिओमध्ये बोलताना राफेलचे डोळेही पाणावले.स्पेनचा दिग्गज टेनिसपटू राफेल नदालने निवृत्तीची घोषणा केली आहे, ज्याने सर्वच टेनिस चाहत्यांना एक धक्का बसला आहे. त्याने आपल्या शानदार कारकिर्दीत २२ ग्रँडस्लॅम जेतेपदे जिंकली.**





या वर्षी नोव्हेंबरमध्ये मालागा येथे होणारी डेव्हिस कप फायनल नदालची शेवटची स्पर्धा असेल. या वर्षाच्या सुरुवातीला पॅरिस ऑलिम्पिकनंतर तो एकही सामना खेळलेला नाही. १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान डेव्हिस कप फायनलमध्ये उपांत्यपूर्व फेरीत स्पेनचा सामना नेदरलँड्सशी होणार आहे. दुखापतीमुळे ग्रुप स्टेजला मुकल्यानंतर नदालचा संघात समावेश करण्यात आला होता.राफेल नदालने व्हिडिओमध्ये सांगितले की, त्याने खूप विचार करून हा निर्णय घेतला आहे. त्याच्या कारकिर्दीतील शेवटचा सामना डेव्हिस कप फायनल असेल. ही तीच स्पर्धा आहे जिथून त्याने २००४ मध्ये यशस्वी कारकिर्दीला सुरुवात केली होती. राफेल नदालने एक व्हिडिओ शेअर केला ज्यामध्ये त्याने सांगितले की, गेली दोन वर्षे त्याच्यासाठी खूप कठीण गेली आहेत. यादरम्यान आपली १०० टक्के कामगिरी करू शकला नाही आणि म्हणूनच तो हा कठीण निर्णय घेत आहे. नदालने १२ भाषांमध्ये पोस्टच्या कॅप्शनमध्ये सर्वांचे आभार मानले आहेत. आपल्या कारकिर्दीत नदालला साथ देणाऱ्या सर्वांचे त्याने आभार मानले.

### कारकिर्दीत 22 ग्रँडस्लॅम जिंकले

आपल्या कारकिर्दीचा बराच काळ ज्यांच्यासोबत घालवला त्या प्रतिस्पर्ध्यांचेही त्याने आभार मानले. नदालने रॉजर फेडरर आणि नोव्हाक जोकोविचसोबत घालवलेल्या क्षणांचा व्हिडिओ शेअर केला आहे. त्याने आपल्या आईचेही आभार मानले. १९ वर्षांपासून त्यांच्याबरोबर असलेल्या पत्नी मेरीचेही त्यांनी आभार मानले. नदालच्या मते, त्याच्या काकांनी त्याच्या कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका बजावली ज्यामुळे त्याने टेनिस खेळायला सुरुवात केली.